मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चक्रपाणी वसाहतीतील रस्त्याला अखेर गती!

## ३० वर्षे प्रलंबित रस्त्याचे काम पूर्ण; आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भोसरी- चक्रपाणी वसाहत येथील गेल्या ३० वर्षांपासून प्रलंबित रस्त्याचे काम अखेर मार्गी लागले असून, सुमारे १ लाख रहिवाशांना दिलासा मिळाला आहे. दिघी-आळंदी मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या या रस्त्यामुळे वाहनचालक आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आमदार महेश लांडगे यांनी ३४५ मीटर लांब आणि ८ मीटर रुंद असलेल्या रस्त्यावर नियमितपणे सुमारे ५० हजार नागरिक-वाहनचालकांची रहदारी असते. त्यामुळे या रस्त्याचे काम मार्गी लावावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी भाजपा आमदार महेश लांडगे यांना केली होती.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांच्या 'आमदार विशेष निधी' योजनेतून या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. दिघी-आळंदी मुख्य रस्त्याला हा चक्रपाणी वसाहतीमधील समांतर रस्ता आहे. या रस्त्यामुळे दिघी-आळंदी रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होणार असून, स्थानिक नागरिकांना दिलासा मिळणार आहे. तसेच, भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन ड्रेनेज व्यवस्थेचे कामही पूर्ण करण्यात आले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून परिसरातील प्रलंबित समस्या मार्गी लागत आहेत. कोणतेही काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला जातो, अशा प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांमधून येत आहेत.

> **“प्रभाग क्रमांक ६ चक्रपाणी वसाहत म्हणजे रेड झोन आणि प्राधिकरणाच्या हद्दीलगत असलेला प्रभाग आहे. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी अनेक अडचणी येतात. गेल्या ३० वर्षांपासून हिच परिस्थिती होती. मात्र, २०१४ पासून आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून परिसरातील पायाभूत सोयी-सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे. – राजेंद्र लांडगे, माजी नगरसेवक.**

# पालिकेकडून कचरा सेवाशुल्काची वसुली थांबेना!

## वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पालिकेने पूर्वलक्षी प्रभावाने सुरू केलेल्या कचरा सेवाशुल्क वसुलीच्या स्थगितीचा आदेश सव्वादोन महिने उलटून गेला, तरी राज्य सरकारकडून आलेला नाही. त्यामुळे वसुली सुरूच असून, आतापर्यंत तीन लाख ५६ हजार १२७ मालमत्ताधारकांनी सुमारे ४४ कोटी ७० लाख ९० हजार रुपये शुल्काचा भरणा केला आहे. या वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध आहे. राज्य सरकारच्या १ जुलै २०१९ रोजीच्या निर्णयानुसार, पालिकांसाठी घनकचरा स्वच्छता व आरोग्य उपविधी कचरा सेवाशुल्क निर्धारित केले. त्यानुसार पिंपरी महापालिका सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या ठरावानुसार शुल्क वसूल करण्यास मान्यता दिली आहे. १ एप्रिल २०२३ पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या देयकांमधून वसुलीचा निर्णय घेतला. शहरात सहा लाख सात हजार मालमत्ता आहेत. घरटी दरमहा ६० रुपये व व्यावसायिक आस्थापना असलेल्या मालमत्तांना आकारमानानुसार शुल्क आकारण्यात येत आहे. शहरात २०१९ पासून २०२३ पर्यंत चार वर्षांचे कचरा शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यानुसार २०१९-२०२० आणि २०२३-२४ या दोन वर्षांचे शुल्क वसूल करण्यास सुरुवात केली मात्र, चार वर्षांचे शुल्क आकारण्यास शहरातील सोसायटीधारकांनी विरोध केला. त्यावर पावसाळी अधिवेशनात आमदार महेश लांडगे यांनी विचारलेल्या लक्षवेधीवर शुल्क वसुलीला स्थगित देण्याची घोषणा सरकारने केली होती, मात्र, अद्याप महापालिकेला शुल्क वसुली स्थगिती दिल्याचा आदेश मिळालेला नाही. त्यामुळे महापालिकेकडून कचरा सेवाशुल्काची वसुली सुरूच आहे.

# पालिका रुग्णालय सुविधांचे ‘ऑडिट’ करण्याची मागणी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** नांदेड, ठाणे आणि नागपूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका रुग्णालयांमधील औषध साठा, सेवा-सुविधांबाबत ‘ऑडिट’ करण्याची मागणी भाजप वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे.

त्यामध्ये म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून राज्यातील शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ठाणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या महाराष्ट्रातल्या शासकीय रुग्णालयांमध्ये मृत्यूचे तांडव सुरु आहे.

या तीनही घटना पाहता पिंपरी-चिंचवड पालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था, सेवा-सुविधा यांचा आढावा घ्यावा. या रुग्णालयात पिंपरी-चिंचवड शहरासह, पुणे आणि इतर जिल्ह्यातील रुग्ण उपचारासाठी येत आहेत.

# लोकसभा लढायची आणि जिंकायची!

## शिरूर, मावळ मनसेच्या बैठकीत निर्धार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शिरूर आणि मावळ लोकसभा (डेझीरलहर) मतदारसंघाची २०२४ ची लोकसभा निवडणूक पूर्ण ताकदीने लढायची आणि जिंकायची असा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. मावळ व शिरूर लोकसभा मतदार संघाची बैठक रणजित शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मनसे नेते अमेय खोपकर, महेश जाधव, सिने अभिनेते व मावळ लोकसभेचे संघटक रमेश परदेशी व पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. खोपकर म्हणाले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जास्तीत जास्त आमदार येणाऱ्या विधानसभेमध्ये निवडून आले पाहिजेत. आपला भगवा त्या ठिकाणी फडकला पाहिजे. महाराष्ट्रातील विविध समस्यांना वाच्या फोडण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित काम करावे. रणजित शिरोळे म्हणाले, पिंपरी विधानसभा चिंचवड विधानसभा , कर्जत विधानसभा,पनवेल विधानसभा, उरण विधानसभा, व मावळ विधानसभा , यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मोठी ताकद आहे. मनसैनिकांनी एक दिलाने एक जोमाने कामाला लागावे मनसेचा हक्काचा खासदार निवडून येईल. बाबू वागस्कर म्हणाले, शिरूर मतदारसंघांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ताकद मोठ्या प्रमाणात आहे. पुढील भवितव्य खूप चांगले आणि मोठे आहे. पक्षाचे संघटन मोठ्या प्रमाणात चांगलं झालेला आहे, अजून जोमाने कामाला लागावे. शिरूर मतदार संघाची बांधणी चांगली करा शिरूर मतदार संघात खासदार हा मनसेचा झाला पाहिजे. अजय शिंदे म्हणाले, भोसरी विधानसभा शिरूर मतदार संघासाठी निर्णायक आहे यासाठी शहरातील नागरिकांच्या ज्या समस्या असतील, त्याला वाच्या फोडण्याचे काम महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केले आहे. शिरूर व मावळ लोकसभा संघाची बांधणी आढावा बैठक घेत असताना पिंपरी विधानसभा, भोसरी विधानसभा,व चिंचवड विधानसभा, या तिन्ही विधानसभा सुमारे तीनशे जणांचा पक्षप्रवेश करण्यात आला. ११ नव्याने शाखाध्यक्ष नेमण्यात आले. शहराध्यक्ष सचिन चिखले, उप शहराध्यक्ष राजू सावळे, विशाल मानकरी , बाळा जाणवले, विभाग अध्यक्ष दत्ता देवतरसे , मयूर चिंचवडे, अंकुश तापकीर, विद्यार्थी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष, हेमंत डांगे, अनिकेत प्रभू, महिला सेनेचे अध्यक्ष सीमा बेलापूरकर, रुपेश पटेकर , महावीर कर्णावर, सचिन शिंगाडे विनोद भंडारी, संगीता देशमुख, अनिता पांचाळ, सुशांत साळवी, जयसिंग भाट, श्रद्धा देशमुख उपस्थित होते.



# पवना जलवाहिनी प्रकल्पाचे काम बंद!

## पाइप ठेवण्याचे भाडे झाले साडेसात कोटी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाच्या कामास गेल्या १२ वर्षांपासून स्थगिती होती. प्रकल्पासाठीचे लोखंडी पाइप व यंत्रसामग्री मावळ तालुक्यातील खासगी जागेत ठेवण्यात आले असून, त्यासाठी सुरक्षारक्षक नेमले आहेत. मागील साडेचार वर्षांतील पाइप ठेवण्याचे भाडे आणि सुरक्षारक्षकांसाठी सात कोटी ६८ लाख २४ हजार ५९७ खर्च जुन्या ठेकेदाराला दिला जाणार आहे.

पवना धरण ते निगडीतील पेठ क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी आणण्याचा प्रकल्प महापालिकेने २००८ मध्ये हाती घेतला होता. ठेकेदाराला ३० एप्रिल २००८ रोजी कार्यारंभ आदेश दिला होता. कामाची मुदत दोन वर्षे म्हणजे २९ एप्रिल २०१० पर्यंत होती. काम सुरू असताना जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर प्रकल्पाच्या विरोधात झालेल्या रास्ता रोको आंदोलनात पोलीस गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तेव्हापासून काम बंद आहे. शासनाने नुकतीच प्रकल्पावरील स्थगिती उठविली आहे. आतापर्यंत केवळ १२.६२ टक्के काम झाले आहे. या कामास ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



### आंदोलनात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू

» पवना धरण ते निगडीतील पेठ क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी आणण्याचा प्रकल्प महापालिकेने २००८ मध्ये हाती घेतला होता. ठेकेदाराला ३० एप्रिल २००८ रोजी कार्यारंभ आदेश दिला होता. कामाची मुदत दोन वर्षे म्हणजे २९ एप्रिल २०१० पर्यंत होती. काम सुरू असताना जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर प्रकल्पाच्या विरोधात झालेल्या रास्ता रोको आंदोलनात पोलीस गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला.

# लाखचा गुटखा साठवल्या प्रकरणी एकाला अटक!



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भाड्याच्या घरात एक लाख रुपयांचा गुटखा साठवल्या प्रकरणी तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई गुन्हे शाखेच्या अमंलीपदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी (दि.५) चिखली येथे करण्यात आली आहे. निरज हरगोवींद कुशवाह (वय २५ रा. चिखली) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्याला गुटखा पुरवणाऱ्या कानाराम (रा. कात्रज) याच्यावरही चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने त्याच्या भाड्याच्या खोलीत विविध कंपनीचे प्रतिबंधीत असलेला गुटखा, पानमसाला असा एकूण १ लाख १४ हजार २२१ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# नॅक प्रक्रियेत सुधारणा करण्याची गरज!

## चंद्रकांत पाटील यांची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना पत्राद्वारे विनंती

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अधिकाधिक उच्च शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदेकडून (नॅक) मुल्यांकन करून घ्यावे यासाठी या प्रक्रीयेत काही सुधारणा करण्यात याव्या अशी विनंती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केंद्रीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्राद्वारे केली आहे. केंद्रीय मंत्री प्रधान यांचे पुणे येथील कार्यक्रमांसाठी आगमन झाल्यावर त्यांचे स्वागत करून मंत्री पाटील यांनी त्यांना या संदर्भातील पत्र दिले. देशातील मोठ्या संख्येने उच्च शिक्षण संस्थांसाठी ही प्रक्रिया सोपी आणि परवडणारी बनवण्यासाठी काही सूचना मंत्री पाटील यांनी पत्राद्वारे केल्या आहे. त्यानुसार उच्च शिक्षण संस्था



या बिगर-व्यावसायिक आणि विना-अनुदान/ स्वयं-वित्तीय तत्त्वावर कार्यरत असायला हव्यात. एकूण विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा कमी,१० हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील संस्था असणे, एकच अभ्यासक्रम असणारे महाविद्यालय, अधिसूचित आदिवासी जिल्ह्यात असावे किंवा फक्त पदवी अभ्यासक्रम चालविणारे महाविद्यालय यापैकी कोणतेही दोन निकष देखील पूर्ण केले पाहिजेत. अशा महाविद्यालयांसाठी कोणतेही श्रेणी नसावी तर केवळ प्रमाणन झालेले किंवा प्रमाणन न झालेले असाच उल्लेख असावा. मूल्यांकन शुल्क कमी केले जावे आणि एकूण खर्चाची मर्यादा १ लाख ५० हजार रुपये असावी. मुल्यांकन समितीचे सदस्यांची संख्या राज्याच्या लगतच्या विद्यापीठ क्षेत्रातून फक्त २ असतील. सुमारे ३० टक्के मेट्रिक्स वैकल्पिक केले जाऊ शकतील आणि त्यासाठीचे वेटेज योग्यरित्या पुनर्विनियोजित केले जाऊ शकेल. पीअर टीमचे सदस्य भेटीच्या वेळी क्वालिटेटीव्ह मेट्रिक्स (क्यूआयएम) ची पडताळणी करू शकत असल्याने मेट्रिक संबंधी प्राचार्यांच्या मेट्रिक संबंधी प्रतिज्ञापत्राशिवाय कोणतीही माहिती सादर (अपलोड) करणे आवश्यक नसावे. नॅकद्वारे मेट्रिक-निहाय सूचना/वेटेजचे पुनर्विनियोजन करण्याची व्यवस्था असावी. उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनाची प्रक्रिया सोपी आणि परवडणारी केल्यास अधिकाधिक संस्थांकडून मूल्यांकन करून घेण्यास गती मिळेल. तसेच प्रक्रियेतील गैरप्रकार टाळता येण्यास मदत होईल. प्रक्रियेला गती देण्याचा अनुषंगाने आवश्यक असल्यास आर्थिक प्रोत्साहन/ शुल्क प्रतिपूर्ती योजनाही केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांद्वारे सामायिकरण आधारावर प्रस्तावित केली जाऊ शकते, असेही मंत्री पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

### खर्चाची मर्यादा १.५० हजार असावी

**» उच्च शिक्षण संस्था या बिगर-व्यावसायिक आणि विना-अनुदान/ स्वयं-वित्तीय तत्त्वावर कार्यरत असायला हव्यात. महाविद्यालयांसाठी कोणतेही श्रेणी नसावी तर केवळ प्रमाणन झालेले किंवा प्रमाणन न झालेले असाच उल्लेख असावा. मूल्यांकन शुल्क कमी केले जावे आणि एकूण खर्चाची मर्यादा १ लाख ५० हजार रुपये असावी. मुल्यांकन समितीचे सदस्यांची संख्या राज्याच्या लगतच्या विद्यापीठ क्षेत्रातून फक्त २ असतील. सुमारे ३० टक्के मेट्रिक्स वैकल्पिक केले जाऊ शकतील आणि त्यासाठीचे वेटेज योग्यरित्या पुनर्विनियोजित केले जाऊ शकेल.**

# न्यायाल्याचे कामकाज ऑनलाईन स्वरूपात व्हावे!

## सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड एकटेच पुरोगामी विचारांचे : ॲड. असीम सरोदे

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** न्यायाल्याचे कामकाज ऑनलाईन स्वरूपात व्हावे यासाठी भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड एकटेच पुरोगामी विचारांचे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा न्यायव्यस्थेत वापर करावा या मताचे आहेत की काय? त्यांनी मांडलेल्या मतांना आणि आदेशांना इतर उच्च न्यायालयांच्या संथ प्रतिसाद का असतो? असे प्रश्न न्यायंत्रणा सतत मागास ठेवणाऱ्या प्रवृत्तींच्या न्यायव्यस्थेतील काही लोकांकडे बघून पडतो असे मत ॲड.असीम सरोदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. त्यांच्यासह लॉ लॅब इनोव्हेशन इंडियाचे सदस्य तसेच ॲड.श्रीया




आवले, ॲड.बाळकृष्ण निढाळकर, ॲड. रमेश तारू उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयासह महाराष्ट्रातील सगळ्या न्यायालयांचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने व हायब्रीड मोडद्वारे सुरू करा या मागणीसाठी 'लॉ लॅब इंडिया' व पक्षकार संघटनेची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात तीन महिने पासून पेंडीग आहे व त्याबाबत कोणतीही सुनावणी होत नाही हे दुर्दैवी आहे. न्यायालय ही व्यवस्था न्याय मागणाऱ्या पक्षकारांच्या व सामान्य नागरिकांच्या मालकीची आहे त्यामुळे ऑनलाइन तसेच हायब्रीड पद्धतीने कामकाज केल्याने त्यांचा सहभाग वाढेल, न्यायालयीन कामकाजाचा खर्च कमी होईल व पारदर्शकता वाढेल असे जनहित याचिकेत नमूद केले असल्याचे ऍड असीम सरोदे म्हणाले. मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार, सुप्रीम कोर्टाची ई-कोर्ट कमिटी व राष्ट्रीय सूचना केंद्र यांना जनहित याचिकेत प्रतिवादी करण्यात आलेले आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल करण्यात आली परंतु त्यावेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्याचे आदेश दिले आणि आता मात्र त्यांनीच भारतातील सर्व उच्च न्यायालयांना दोन आठवड्यात ऑनलाइन तसेच हायब्रीड मोड पद्धतीने कामकाज सुरू करण्याचे आदेश दिले हे अनाकलनीय आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील कोणत्याच बार असोसिएशनद्वारे अशा प्रश्नांवर कृतीशीलता दाखविण्यात येत नाही. खरे तर ऑनलाइन व हायब्रीड मोड पद्धतीने उच्च न्यायालयांचे कामकाज चालावे ही मागणी सगळ्यांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य निबंधकांकडे करावी यासाठी आम्ही महाराष्ट्रातील ३८ जिल्हा बार असोसिएशनला पत्र पाठविले आहेत. ऑनलाईन व हायब्रीड पद्धतीने उच्च न्यायालयाचे कामकाज चालवणे हा संविधानातील कलम २१ नुसार नागरिकांच्या मुलभूत हक्कांचा भाग आहे असे जाहीर करावे, ऑनलाईन व हायब्रीड पद्धतीने उच्च न्यायालयाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक ते नियम व कार्यपद्धती ठरऊन जाहीर करावी, उच्च न्यायालयात दाखल कागदपत्रे वकील व पक्षकारांना ऑनलाईन बघता - यावीत, कोणत्या केसेस लागणार याचा टाइम टेबल एक आठवडा आधीच जाहीर करावी अश्या मागण्या जनहित याचिकेतून करण्यात आलेल्या आहेत.पुढील महिन्याभरात अनेक तांत्रिक बदल उच्च न्यायालयाच्या कामकाजात होतील आणि ऑनलाईन व हायब्रीड पद्धतीने उच्च न्यायालयाचे कामकाज सुरु करण्याशिवाय आता पर्याय नाही.

# स्वास्थ्यपूर्ण जगासाठी आयुर्वेद शाश्वत हाच पर्याय!

## राष्ट्रीय संशोधक प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांचे मत



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आयुर्वेदासह इतर भारतीय चिकित्सा पद्धतींचे महत्व अनेकदा अधोरेखित झाले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने देखील आयुर्वेदाला, भारतीय पारंपरिक चिकित्सेला प्रोत्साहन दिले असून, औषध निर्माणाचा पहिला प्रकल्प जामनगरला उभारला आहे. स्वास्थ्यपूर्ण जगासाठी आयुर्वेद हा शाश्वत पर्याय असून, त्याला लोकाभिमुख करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत असे मत आयुष मंत्रालयातील राष्ट्रीय संशोधक प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केले. आयुर्वेदावर शंका उपस्थित करून त्याला डावलण्याचे षडयंत्र काही लोक करत असून, त्याला मोडीत काढण्यासाठी आपल्याला जागरूक राहायला हवे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट कोल्हापूर आणि श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री विश्व व्याख्यानमाला व सातव्या राष्ट्रीय आयुर्वेद परिषदेचे उद्धाटन डॉ. पटवर्धन यांनी केले. कोंढवा रस्त्यावरील वर्धमान सांस्कृतिक केंद्रात झालेल्या सोहळ्यास ज्येष्ठ नेते माजी आमदार उल्हास पवार, आमदार माधुरी मिसाळ, इस्कॉनचे सुंदरवर दास, भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाच्या बोर्ड ऑफ एथिक्स अँड रजिस्ट्रेशनचे अध्यक्ष वैद्य राकेश शर्मा, ट्रस्टचे अध्यक्ष श्री सद्गुरू आनंदनाथ महाराज सांगवडेकर, मुख्य चिकित्सक व विश्वस्त वैद्य समीर जमदग्नी, श्री विश्ववतीचे अध्यक्ष निरंजनदास सांगवडेकर, श्री धूतपापेश्वरचे रणजित पुराणिक, बैद्यनाथचे सिद्धेश शर्मा आदी उपस्थित होते. डॉ. पटवर्धन म्हणाले, अनेक वैद्याकडून बरेच काही शिकलेलो आहे. भारतीय संस्कृती, परंपरा यामध्ये भेदभाव नाही. नवनवीन संशोधन, नवोन्मेष करून आयुर्वेद अधिकाधिक विकसित व समृद्ध करण्यासाठी योगदान दिले पाहिजे. आयुष मंत्रालयाच्या मार्फत या भारतीय चिकित्सा पद्धती प्रभावशाली व लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. माधुरी मिसाळ म्हणाल्या, भारतीय चिकित्सा आणि ज्ञानवंत सर्वश्रेष्ठ आहे. आयुषमुळे आयुर्वेदाला प्रोत्साहन मिळाले आहे. सरकारने पुढाकार घेतल्याने आयुर्वेदाला चांगले दिवस आले आहेत. फ्रान्स, रशिया यांसारख्या देशांत आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार मोठ्या होतो; तर आयुर्वेदाचे मूळ असलेल्या भारतात त्याला प्राधान्याने स्वीकारायला हवे. आयुर्वेदाच्या संवर्धनासाठी भविष्यात सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. उल्हास पवार म्हणाले, भारतीय संस्कृती, परंपरेत आयुर्वेदाला फार महत्व आहे. अलीकडच्या काळात पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाने या भारतीय चिकित्सा व परंपरा काहीशा मागे पडल्या. परंतु, आयुर्वेद, योग याविषयी समाजात जागृती होत आहे. आयुर्वेदाला लोकप्रिय व परिणामकारक करण्याचे दायित्व तुम्हा आयुर्वेदिक डॉक्टरांवर आहे. चांगले संशोधन करून आयुर्वेद गुणकारी करण्यावर भर द्यावा.

### आयुषमुळे आयुर्वेदाला प्रोत्साहन

**» भारतीय संस्कृती, परंपरा यामध्ये भेदभाव नाही. नवनवीन संशोधन, नवोन्मेष करून आयुर्वेद अधिकाधिक विकसित व समृद्ध करण्यासाठी योगदान दिले पाहिजे. आयुष मंत्रालयाच्या मार्फत या भारतीय चिकित्सा पद्धती प्रभावशाली व लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. माधुरी मिसाळ म्हणाल्या, भारतीय चिकित्सा आणि ज्ञानवंत सर्वश्रेष्ठ आहे. आयुषमुळे आयुर्वेदाला प्रोत्साहन मिळाले आहे.**

# तानाजी सावंत व हसन मुश्रीफांनी राजीनामा द्यावा!

## महाराष्ट्र डॉक्टर्स कॉर्डिनेशन कमिटीची मागणी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील नागपूर, संभाजीनगर, नांदेड, ठाणे, पुणे अशा विविध शासकीय रुग्णालयात शासनाचे बेजाबदादर कृतीमुळे अनेक रुग्णांचे नाहक बळी गेले आहे. त्यामुळे याबाबत योग्य चौकशी करुन आरोग्य मंत्री तानाजी सावंत व मंत्री हसन मुशीफ यांनी जबाबदारी स्वीकारुन पदाचे राजीनामे द्यावे अशी मागणी महाराष्ट्र डॉक्टर्स कॉर्डिनेशन कमिटीतर्फे ॲड. सुदर्शन गिरडे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केली. यावेळी डॉ. संजय दाभाडे डॉ. संतोष शिंगवी उपस्थित होते. डॉ. गिरडे म्हणाले, नांदेड जिल्ह्याच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात गेल्या दोन दिवसात आतापर्यंत औषधाअभावी व अपुऱ्या मनुष्यबळा अभावी ३१ रुग्णांचा दुर्देवी मृत्यु झाला आहे याची सखोल चौकशी करण्यात यावी. अपुरे मनुष्यबळ, खंडीत औषध पुरवठा, बंद पडलेली तपासणी यंत्रे, साधनसुविधांची कमतरता यामुळे राज्यातील सरकारी रुग्णालयांची अवस्था बिकट आहे. सन-२०१७ पासून हाफकीन बायो फार्मास्युटीकल कॉर्पिरेशन सरकारी आरोग्य सेवा व सरकारी वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयांसाठी औषधे व साहित्य खरेदी करुन पुरवठा करत होते. परंतु सध्याचे सरकार आल्यानंतर त्यांनी वार्षिक १८०० ते दोन हजार कोटींचे बजेटची औषध व साहित्य खरेदीचे केंद्रीकरण करुन



महाराष्ट्र मेडिकल गुडस प्रोक्युरमेंट ॲथॉरिटीची १६ जणांची समिती मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बनवली. मार्च नंतर याद्वारे खरेदी प्रक्रिया होत असून आता हाफकीन कडून औषधे खरेदी हात नाही. टेंडर मंजुरीच्या प्रक्रीयेत अर्थकारण येत असल्यामुळे खरेदी व पुरवठयास विलंब होत आहे. स्थानिक पातळीवर रुग्ण कल्याण समिती किंवा तातडीच्या औषध खरेदीसाठी तुटपुंजी तरतूद असल्याने काही आवश्यक औषधांची अल्पप्रमाणात खरेदी करण्यात येते. औषधे खरेदीचा वाद सुटण्यास विलंब होत असल्याने रुग्णांचे हाल होऊन बळी जात आहे, डॉ. संजय दाभाडे म्हणाले, सरकारी व मनपा रुग्णालयात मंजुर बेड क्षमतेपेक्षा अधिक बेड असतात. या रुग्णालयात मंजुर बेडच्या प्रमाणातच मनुष्यबळ मंजुर केले होते. मंजुर केलेले मनुष्यबळही पूर्ण उपलब्ध होत नाही. मात्र, मंजुर बेडच्या दुप्पट, तिप्पट बेड टाकले जातात. त्यामुळे रुग्ण अवस्था बिकट होऊन आरोग्य कर्मचाऱ्यांवर ताण येऊन रुग्ण बळी जाण्याची शक्यता निर्माण होते. नांदेड रुग्णालयात ५०० बेडची मंजुरी असून तिथे १५०० पेक्षा अधिक रुग्ण भरती आहे. २७१ कर्मचारी उपलब्ध असताना त्यातील ७० जणांची बदली झालेली आहे. नवजात शिशु वॉर्डात २४ बेड उपलब्ध असताना ६५ पेक्षा जास्त नवजात शिशु उपलब्ध आहे. ६५ पैकी २४ वर्मर चालू असून बाकीचे दुरुस्ती प्रतिक्षेत आहे. नांदेड येथील वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठता डॉ. शामराव वाकोडे यांना टॉयलेट साफ करण्यास भाग पाडणारे खा.हेमंत पाटीलांची खासदरकी रद्द करण्यात यावी अशी आमची मागणी आहे.

### औषध खरेदीसाठी तुटपुंजी तरतूद

**» स्थानिक पातळीवर रुग्ण कल्याण समिती किंवा तातडीच्या औषध खरेदीसाठी तुटपुंजी तरतूद असल्याने काही आवश्यक औषधांची अल्पप्रमाणात खरेदी करण्यात येते. औषधे खरेदीचा वाद सुटण्यास विलंब होत असल्याने रुग्णांचे हाल होऊन बळी जात आहे, डॉ. संजय दाभाडे म्हणाले, सरकारी व मनपा रुग्णालयात मंजुर बेड क्षमतेपेक्षा अधिक बेड असतात. या रुग्णालयात मंजुर बेडच्या प्रमाणातच मनुष्यबळ मंजुर केले होते.**